SAMPLE CONTENT

मराठी सुलभभारती

Build
Powerful
Concepts

STD. V
(Eng. Med.)

प्राची शेंडे
M.Com., C.A.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित.

इयत्ता पाचवी

मराठी सुलभभारती



Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.

Balbharati Registration No.: 2018MH0022 **TEID: 2134** P.O. No. 2454

प्रस्तावना

नमस्कार,

महाराष्ट्र शिक्षण मंडळाने नियोजित केलेला इयत्ता ५ वी चा 'मराठी सुलभभारती'चा अभ्यासक्रम अधिक कल्पक आणि मुलांचे भाषेचे ज्ञान वाढवणारा आहे. यावर आधारित **टार्गेट प्रकाशनाचे इयत्ता ५ वी मराठी सुलभभारती** हे पुस्तक मुलांच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे.

CCE पॅटर्ननुसार प्रत्येक पाठाचे संकलित मूल्यमापन व आकारिक मूल्यमापन यांत विभाजन केले आहे. संकलित मूल्यमापन विभागात पाठाखालील प्रश्नोत्तरे आहेत, सोबतच सरावासाठी अधिक प्रश्नोत्तरेही दिली आहेत. तसेच, 'भाषाभ्यास व व्याकरण' या भागात भाषेच्या व्याकरणातील नाम, क्रियापद, लिंग, वचन, विरुद्धार्थी शब्द, समानार्थी शब्द, यमक, विरामचिन्हे यांसारख्या प्राथमिक व्याकरणिक संकल्पनांवर आधारित प्रश्नांचा समावेश केला आहे.

आकारिक मूल्यमापनासाठी विद्यार्थ्यांचे भावविश्व व्यापणारी गाणी, कविता, गोष्टी, चित्रकथा, चित्रसंदेश, अनुभव, शब्दकोडी, सूचना अशा वैविध्यपूर्ण व कल्पक प्रश्नांचा समावेश या पुस्तकात केला आहे. त्यामुळे, खेळता खेळता शिकण्याचा आनंददायक अनुभव विद्यार्थ्यांना घेता येईल.

विद्यार्थ्यांचे संस्कारक्षम वय जाणून प्रकट वाचन, मूकवाचन, अनुलेखन व श्रुतलेखन यांसाठी विविध सूचना या पुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. सोबतच अक्षरांपासून शब्द बनवणे, त्यांची कार्डे तयार करणे, नादमय शब्द शोधणे, भाषिक खेळ खेळणे, एका शब्दातील अक्षरांपासून अनेक शब्द तयार करणे, यांसारख्या प्रश्नांच्या समावेशामुळे विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती अधिकाधिक समृद्ध होण्यास मदत होईल.

मुलांच्या सर्जनशीलतेस वाव देणारे विविध उपक्रमही या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहेत. या पुस्तकात प्रत्येक पाठासाठी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम दिले आहेत ज्यामुळे मुलांची त्या-त्या विषयाची समज परिपक्व होण्यास मदत होईल.

अभ्यास करताना आपली तयारी जोखणंही महत्त्वाचं असतं. त्यामुळे, पुस्तकाच्या शेवटी पाठांवर आधारित दोन सराव प्रश्नपत्रिकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापनासाठी त्यांची निश्चितच मदत होईल. एकूणच, मजेशीर कृतींतून मुलांना मिळणारा आनंद आणि या आनंदाच्या मार्गाने मिळणारे ज्ञान असा सुंदर मेळ या पुस्तकात साधला आहे.

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी हे पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या ईमेल पत्त्यावर पाठवावा ही विनंती.

कल्पक अभ्यासासाठी मुलांना खूप खूप शुभेच्छा!

प्रकाशक

आवृत्ती: द्वितीय

Sample Content

Disclaimer

This reference book is transformative work based on textual contents published by Bureau of Textbook. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

अनुक्रमणिका

अ.क्र	पाठाचे नाव	लेखक/कवी	पृ.क्र.
१.	नाच रे मोरा (गाणे)	ग. दि. माडगूळकर	१
२.	हत्तीचे चातुर्य (चित्रकथा)	-	५
३.	खेळूया शब्दांशी	-	१०
४.	ही पिसे कोणाची?	-	१५
५.	डराव डराव! (कविता)	ग. ह. पाटील	२१
६.	ऐकूया. खेळूया.	-	२६
७.	खेळत खेळत वाचूया!	-	२८
८.	कोणापासून काय घ्यावे? (कविता)	निलम माणगावे	३०
९.	सिंह आणि बेडूक (चित्रकथा)	मुकुंद तळवलकर	३४
१०.	बैलपोळा (कविता)	धोंडीरामसिंह राजपूत	३८
११.	इंधनबचत	-	४३
१२.	बोलावे कसे?	-	४८
१३.	अनुभव - १	-	५२
१४.	चित्रसंदेश	-	५७
१५.	नदीचे गाणे (कविता)	वि. म. कुलकर्णी	६०
१६.	मी नदी बोलते...	-	६५
१७.	आमची सहल	-	७२
१८.	पैशांचे व्यवहार	-	८०
१९.	अनुभव - २	-	८५
२०.	गमतीदार पत्र	-	९०
२१.	छोटेसे बहीणभाऊ (कविता)	वसंत बापट	९५
२२.	वाचूया. लिहूया.	-	९९
२३.	प्रामाणिक इस्त्रीवाला	-	१०६
२४.	ऐका. पाहा. करा.	-	११२
२५.	मालतीची चतुराई	-	११४
२६.	पतंग (कविता)	अ. ज्ञा. पुराणिक	१२१
२७.	महर्षी विठ्ठल रामजी शिंदे	डॉ. भि. ना. दहातोंडे	१२५
२८.	फुलपाखरू आणि मधमाशी	बाळ गाडगीळ	१३०
	लेखन विभाग		१३८
	प्रथम सत्रांत परीक्षा		१४४
	द्‌वितीय सत्रांत परीक्षा		१४६

टीप : पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

मराठी सुलभभारती

Sample Document

४. ही पिसे कोणाची?

Summary:

'ही पिसे कोणाची?' is a lesson about a girl called Minu.

Once while playing, Minu comes across a couple of feathers on her way. The lesson talks about Minu's journey to find that righeful owner of the feathers.

Minu begins by asking the hen and the pigeon about the feathers but they both say that these feathers don't belong to them. Then, she asks the peacock and he tells her that the feathers belong to the duck. When Minu asked the duck, he said, yes, the feathers belong to him.

Minu wants to return the feathers to the duck but the duck tells her that once the feathers are dropped they cannot be attached back to their body. The duck suggests Minu to keep the feathers with her and Minu keeps them carefully in her notebook.

शब्दार्थ

आभार	धन्यवाद (thanking)
आवड	रुची (liking)
ऐटदार	डौलदार, रुबाबदार (graceful)
करडा	राखाडी (ash colour)
किनारा	तट (shore)
कौतुक	(praise, appreciation)
खुराडे	कोंबडीचे घर (coop of hen)
झाडी	झाडांचा समूह (a thicket)
दाट	गच्च (dense)
दूर	लांब (far away)

निरखून पाहणे	लक्षपूर्वक पाहणे, लक्ष देऊन पाहणे (to observe keenly)
निरीक्षण करणे	नीट पाहणे (to observe)
पत्ता	(address)
पिसारा	खूप पिसांचा गुच्छ (a plumage)
पिसं	(feathers)
मोहक	सुंदर, आकर्षक (attractive)
लांबसडक	लांबच लांब (very long)
सावरणे	सांभाळणे (to take care)
सांभाळून	जपून (carefully)
हाक मारणे	(to call out)

संकलित मूल्यमापन (Summative Assessment)

पाठाधारित प्रश्नोत्तरे (Questions Based on Lesson)

प्र.१. रिकाम्या जागी जुळणाऱ्या योग्य पर्यायापुढे '✓' अशी खूण करा.

*१. पिसे सापडल्यावर मिनूला ...

अ. पिसे कोणाची आहेत, हे माहीत करून घ्यायचे होते. ☐

आ. पिसे घरी न्यायची होती. ☐

२. मोराचे आभार मानून मिनू ...

अ. पळतच खुराड्याकडे गेली. ☐

आ. पळतच नदीवर आली. ☐

३. बदकाने पिसे मिनूजवळच ठेवायला सांगितले, कारण ...

अ. बदकाची पिसं देण्यासाठी मिनू खूप दूर आली. ☐

आ. त्याला ती पिसं नको होती. ☐

उत्तर: १. अ. ☑ २. आ. ☑ ३. अ. ☑

Sample Content

प्र.२. कोण, कोणास म्हणाले ते लिहा.

१. "कोंबडीताई ही पिसं तुझी आहेत का?"
२. "कोणाची आहेत बरं ही पिसं?"
३. "ही पिसं तर बदकाची आहेत."
४. "मला बदक कोठे भेटेल?"
५. "ही पिसं तुझ्याजवळच ठेव."

उत्तर: १. मिनू कोंबडीला म्हणाली.
२. मिनू स्वत:ला म्हणाली.
३. मोर मिनूला म्हणाला.
४. मिनू मोराला म्हणाली.
५. बदक मिनूला म्हणाला.

प्र.३. कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. ..... पिसांकडे निरखून पाहिले. (मिनूने / कोंबडीने / मुलांनी)
२. समोरून आपला ..... सावरत मोर येत होता. (तुरा / डौल / पिसारा)
३. मोराचा पिसारा खूप ..... दिसत होता. (करडा / मोहक / विचित्र)
४. मोराने बदकाचा ..... सांगितला. (रंग / पत्ता / त्रास)

उत्तर: १. **कोंबडीने** पिसांकडे निरखून पाहिले.
२. समोरून आपला **पिसारा** सावरत मोर येत होता.
३. मोराचा पिसारा खूप **मोहक** दिसत होता.
४. मोराने बदकाचा **पत्ता** सांगितला.

***प्र.४.जोड्या जुळवा.**

अनु. क्र.	'अ' गट		'ब' गट
१.	बदक	अ.	झाड
२.	कोंबडी	आ.	नदी
३.	कबुतर	इ.	खुराडे

उत्तर: १. बदक - नदी २. कोंबडी - खुराडे ३. कबुतर - झाड

प्र.५. उत्तरे सांगा.

***१. मिनूचे घर कोठे होते?**
उत्तर: मिनूचे घर शेतात होते.

२. कोंबडी कोठे जाऊन बसली?
उत्तर: कोंबडी खुराड्यात जाऊन बसली.

३. कबुतराचा रंग कसा होता?
उत्तर: कबुतराचा रंग पांढरा-करडा होता.

४. मोराची चाल कशी होती?
उत्तर: मोराची चाल ऐटदार होती.

५. मोराचा पिसारा कसा होता?
उत्तर: मोराचा पिसारा रंगीबेरंगी लांबसडक होता.

***६. मिनूला बदकाचा पत्ता कोणी सांगितला?**
उत्तर: मिनूला बदकाचा पत्ता मोराने सांगितला.

७. नदीकिनारी काय होते?
उत्तर: नदीकिनारी दाट झाडी होती.

***८. पिसे कोणाची होती?**
उत्तर: पिसे बदकाची होती.

Sample Content

***९. बदकाने मिनूला काय सांगितले?**

उत्तर: बदकाने मिनूला सांगितले, की गळून पडलेली पिसे पुन्हा जोडली जात नाहीत, तेव्हा अशी वेगवेगळी पिसे तू जपून ठेव.

***१०. मिनू कोणाकोणाला भेटली?**

उत्तर: मिनू कोंबडी, कबुतर, मोर व बदक यांना भेटली.

भाषाभ्यास व व्याकरण (Vocabulary and Grammar)

प्र.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

१. दूर = ... २. झाड = ... ३. मोहक = ...
४. आनंद = ... ५. पळणे = ... ६. घर = ...
७. नदी = ...

उत्तर: १. दूर = लांब २. झाड = वृक्ष, तरु ३. मोहक = आकर्षक
४. आनंद = हर्ष, मोद ५. पळणे = धावणे ६. घर = गृह, आलय
७. नदी = सरिता

प्र.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

१. दूर × ..... २. पुढे × ..... ३. आनंद × .....
४. दाट × ..... ५. बाहेर × ..... ६. सापडणे × .....

उत्तर: १. दूर × जवळ २. पुढे × मागे ३. आनंद × दु:ख
४. दाट × विरळ ५. बाहेर × आत ६. सापडणे × हरवणे

प्र.३. खाली दिलेल्या शब्दांच्या आधी तो, ती किंवा ते लिहा.

१. शेत २. कोंबडी ३. कबुतर ४. पिसारा
५. बदक ६. नदी ७. वही ८. पीस

उत्तर: १. ते शेत २. ती कोंबडी ३. ते कबुतर ४. तो पिसारा
५. ते बदक ६. ती नदी ७. ती वही ८. ते पीस

प्र.४. खालील तक्ता पूर्ण करा.

एक	अनेक
.....	पिसे
कोंबडी	.....
मोर	.....
.....	झाडे
नदी	.....

उत्तर:

एक	अनेक
पीस	पिसे
कोंबडी	**कोंबड्या**
मोर	**मोर**
झाड	झाडे
नदी	**नद्या**

Sample Content

प्र.५. उदाहरणे वाचा. त्याप्रमाणे लिहा.

उदाहरणे - घर - घरापासून, घर - घराजवळ, खुराडे - खुराड्यात

*१.	गाव	*२.	पाय	*३.	तळे	*४.	घरटे
५.	शाळा	६.	होडी	७.	झाडी	८.	शेत

उत्तर:

१.	गाव	गावापासून	गावाजवळ	गावात
२.	पाय	पायापासून	पायाजवळ	पायात
३.	तळे	तळ्यापासून	तळ्याजवळ	तळ्यात
४.	घरटे	घरट्यापासून	घरट्याजवळ	घरट्यात
५.	शाळा	शाळेपासून	शाळेजवळ	शाळेत
६.	होडी	होडीपासून	होडीजवळ	होडीत
७.	झाडी	झाडीपासून	झाडीजवळ	झाडीत
८.	शेत	शेतापासून	शेताजवळ	शेतात

प्र.६. हे शब्द असेच लिहा.

१.	निरखून	२.	खुराडा	३.	पांढरा	४.	करडा
५.	पिसारा	६.	रंगीबेरंगी	७.	निरीक्षण	८.	पत्ता
९.	नदीकिनारा	१०.	कौतुक	११.	वेगवेगळे		

आकारिक मूल्यमापन (Formative Assessment)

***प्र.१. तुम्हांला शाळेत / वर्गात एखादी वस्तू सापडली, तर तुम्ही काय करता?**

उत्तर: मी ती वस्तू निरखून पाहतो. माझ्या मित्रमैत्रिणींची असेल, तर त्यांना परत देतो. नाहीतर शिक्षकांकडे जमा करतो.

प्र.२. खालील चित्रे पाहून प्राण्यांची योग्य घरे सांगा.

प्राणी			घरे
चिमणी	१	अ	 गोठा
उंदीर	२	आ	गुहा
गाय	३	इ	घरटे
वाघ	४	ई	 बीळ

उत्तर: १. चिमणी - घरटे २. उंदीर - बीळ ३. गाय - गोठा ४. वाघ - गुहा

Sample Content

प्र.३. खाली दिलेल्या चित्रांतील पक्षी ओळखून नावे लिहा.

१. 

.....

२. 

.....

३.

.....

४.

.....

उत्तर: १. कावळा २. पोपट ३. घुबड ४. सुतारपक्षी

प्र.४. खाली दिलेले बिंदू क्रमानुसार जोडा व तयार झालेले चित्र रंगवा व खाली पक्ष्याचे नाव लिहा.



पक्ष्याचे नाव: .....

उत्तर: पोपट

Sample Content

उपक्रम (Activity)

***प्र.१. तुमच्या परिसरात आढळणाऱ्या विविध पक्ष्यांच्या पिसांचे निरीक्षण करा व त्यांचे आकार, रंग यांची माहिती लिहा.**

उत्तर:

अनु. क्र.	पक्षी	पिसाचा आकार	पिसाचा रंग
१.	पोपट	छोटे	पोपटी
२.	कबुतर	लांब	काळा, करडा, पांढरा
३.	कावळा	लांबलचक	काळा
४.	चिमणी	छोटे	तपकिरी, पांढरा
५.	मोर	गोलाकार व मोठे	हिरवा, निळा, जांभळा, तपकिरी
६.	बगळा	लांबलचक, निमुळते	पांढरा, पिवळा, करडा
७.	कोंबडी	छोटे	पांढरा, राखाडी, काळी, लालसर पिवळी

प्र.२. विविध पक्ष्यांची पिसे जमा करा. एका मोठ्या पुठ्ठ्यावर प्रत्येक पक्ष्याचे चित्र आणि त्यासमोर त्याचे पीस चिकटवा. त्याखाली त्या पक्ष्याचे नाव लिहा.

[**टीप:** हा उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: करावा.]

Sample Content

AVAILABLE BOOKS FOR STD. V:
(ENG. & MAR MED.)

NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Environmental Studies (Part ONE & TWO)
- Mathematics

WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Environmental Studies (Part ONE)
- Environmental Studies (Part TWO)
- Mathematics

AVAILABLE BOOKS FOR STD. VI:
(ENG. & MAR MED.)

NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics & Geography
- General Science
- Mathematics

WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App



An extensive compilation of the most likely questions for SSC Boards.

OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

Visit Our Website

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

Address:
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

Tel: 88799 39712 / 13 / 14 / 15
Website: www.targetpublications.org
Email: mail@targetpublications.org

Explore our range of STATIONERY